| |
|---|
| सं.फौ.ख.क्र.८३२८/२०२३ |
| पराग -वि- संजय |
| निशाणी क्र.१ |

**<u>सत्यापन (Verification)</u>**

मी शपथेवर खरे सांगतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | पराग प्रभाकर देशपांडे, |
| **वय** | : | ५२ वर्ष |
| **धंदा** | : | व्यवसाय, |
| **राहणार** | : | प्लॉट क्र.१३२, 'प्रभुकृपा', सेवादल नगर, मानेवाडा, नागपूर |

मी माझ्या घरी एकटाच राहतो, माझे आई वडील मरण पावले आहेत. माझ्या घराच्या शेजारील लोक आणि माझे नातेवाईक यांनी सतत माझ्याविरुध्द सात महिण्यात तीन तक्रारी केल्या आहेत. पहिली तक्रार दिनांक १०.११.२०२२ रोजी एकूण सात लोकांनी मिळून अजनी पोलीस स्टेशन तसेच गृहमंत्री महोदय यांना केली आहे. तसेच दुसरी तक्रार दिनांक १६.१२.२०२२ रोजी दोन तक्रारदार व सहा साक्षीदार असे मिळून आठ जणांनी मा. पोलीस निरीक्षक, अजनी पोलीस स्टेशन तसेच पोलीस महासंचालक श्री संजय पांडे सर मुंबई येथे केली आहे. आणि तिसरी तक्रार दिनांक ३०.०५.२०२३ रोजी गैरअर्जदार क्र. ९ यांनी अजनी पोलीस स्टेशनच्या नावाने करण्यात आली आहे.

२. सर्व तक्रारी गैरअर्जदारांनी आपसात संगणमत करुन, साठगाठ करुन व अपराधी षडयंत्र रचुन, कटकारस्थान करुन मला विनाकारण त्रास देण्याच्या उद्देशाने व मला खोटया अपराधीक गुन्हयात फसविण्याच्या उद्देशाने सात महिन्यात तीन तक्रारी केलेल्या आहेत. मी कोणतेही गैरकृत्य केले नाही तसेच माझी कोणतीही चुक नसतांना सुडबुध्दीने व आकसवृत्तीने त्यांनी माझ्याविरुध्द तक्रारी केलेल्या आहेत आणि माझ्यावर संगीन स्वरुपाचे बरेच अपराधीक आरोप करण्यात आले आहेत पहिला म्हणजे मानसीक आजाराने ग्रस्थता, महिलांच्या विनयभंगाबाबतचा आरोप सर्वांनी माझ्यावर लावला आहे. तसेच माझ्या वडीलांच्या खुनाचा आरोप तसेच मानसीक आजाराने ग्रस्त असा तोंडी स्वरुपातील आरोप गैरअर्जदार क्र. ६ यांनी माझ्या

घरासमोरील रस्त्यावर अपराधीक कृत्य करून लावलेला आहे. सदर आरोप त्यांनी माझ्यावर दिनांक ०२ मार्च २०२३ रोजी सकाळच्या वेळेस लावला आहे.

३. गैरअर्जदार एकुण १० असून त्यापैकी ४ गैरअर्जदार माझे नातेवाईक आहेत. गैरअर्जदार क्र. १, २, ३ आणि १० हे माझे नातेवाईक आहेत. व ईतर गैरअर्जदार हे माझ्या घराशेजारी राहणारे एकाच वस्तीत राहणारे लोक आहेत. यांचा उद्देश असा आहे की, मला मानसीक त्रास, शारीरीक त्रास दयायचा आहे तसेच माझी बदनामी व मानहाणी केली असल्यामुळे माझ्या व्यवसायावर त्याचा परिणाम होउन माझे आर्थीक नुकसान झाले आहे. गैरअर्जदार यांनी माझी बदनामी करणारे आरोपी विभीन्न सरकारी विभागात लेखी स्वरुपात तसेच माझ्या नातेवाईकांत व माझ्या वस्तीत सुध्दा त्यांनी माझी बदनामी केली. त्यामुळे माझी प्रतिष्ठा मलीन करण्याचे कृत्य त्यांनी केले. तरी आरोपीविरुध्द कारवाई करुन दंड व शिक्षा व्हावी.

वर नमुद केलेला मजकूर मी सांगितलेला असून तो बरोबर आहे.

..............................

(फिर्यादीची सही)

माझे समक्ष

TRUPTI NITIN JADHAV

Digitally signed by TRUPTI NITIN JADHAV
Date: 2024.07.08 14:52:15 +0530

(श्रीमती टी.एन. जाधव)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक ०६.०७.२०२४